## ५.६ ठळक निष्कर्ष :

१. दै. लोकमत व दै. सध्यानंदमधून मनोरंजनातून वाचकांशी संवाद साधण्याचे कार्य या दोन्ही दैनिकांनी केले आहे.

२. मनोरंजनात्मक पत्रकारितेतून दोन्ही दैनिकातील वाचकांशी संवाद शास्त्रीय पद्धतीने त्याचा सखोल अभ्यास केला आहे.

३. मनोरंजन पत्रकारितेतून लोकप्रबोधन, लोकशिक्षण व त्याचा वाचकांवर पडलेला प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडला आहे.

४. मनोरंजन पत्रकारितेमूळे मराठी वृत्तपत्रामध्ये एक नविन लाट येवून वाचकांना नाविन्यपूर्ण माहिती देण्याचे काम या दोन दैनिकांनी केले आहे.

५. दोन्ही वृत्तपत्रातून मनोरंजन पत्रकारितेच्या क्षेत्रातील यश मोठे आहे. काही प्रमाणात त्याच्या मर्यादासुद्धा स्पष्टपणे दिसतात.

६. दै. लोकमत व दै. सध्यानंदमध्यून संगीत, विनोद, विविध कला, खेळ, व्यंगचित्रे, चित्रपट, सर्कस व इतर मनोरंजनात्मक बातम्यांतून वाचकांशी मनोरंजनात्मक प्रबोधन करण्यात हे दोन्हीही वृत्तपत्रे सफल ठरले आहेत.

७. दै. सध्यानंदने मोठ्या प्रमाणावर मनोरंजन पत्रकारितेमध्ये बदल घडवून आणले आहेत.

८. दै. लोकमत हा मराठीमधील अग्रगण्य दैनिक असून म्हणावे तसे मनोरंजनात्मक पत्रकारितेला विशेष असे योगदान देऊ शकले नाही.

९. दै. सध्यानंदने मराठी पत्रकारितेला मनोरंजनात्मक बातम्या कशा पद्धतीने घ्याव्यात याची मांडणी इतर मराठी भाषिक वृत्तपत्रांना करुन दिली आहे.

१०. दै. लोकमत हे मनोरंजनात्मक पत्रकारितेमध्ये कमी पडले असून व त्याची मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न करावा.

११. दै. सध्यानंदने आपल्या रंगीत पुरवणीद्वारे माहिती व ज्ञान देण्याचे काम केलेले आहे.

१२. मानवाला जीवनामध्ये माहिती आणि ज्ञान देण्याचे काम या दोन्ही वृत्तपत्राने केले आहे.

१३. दै. लोकमत व दै. सध्यानंद यांनी आपआपल्या परीने कमी प्रमाणात मनोरंजनात्मक पत्रकारितेला आपआपल्या पद्धतीने योगदान दिले आहे.

१४. दै. सध्यानंदने स्त्री, पुरुष, बालक व प्रौढ असणाऱ्या वाचक वर्गांना मनोरंजनात्मक पद्धतीने वार्ता देऊन त्यांच्या ज्ञानामध्ये भर टाकण्यात आला आहे.

१५. दै. लोकमत व दै. सध्यानंदने मनोरंजनात्मक पत्रकारितेला महत्त्वाचे स्थान देवून कमी अधिक प्रमाणात प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## ५.७ उपयुक्त सुचना / शिफारशी :

१. दोन्ही वृत्तपत्रांनी मनोरंजन पत्रकारितेसाठी दररोज अर्धेपान मनोरंजन विषयक द्यावे.

२. व्यंगचित्रे, शब्दकोडे यांना विशेष स्थान देण्यात यावे.

३. बोधकथा आणि बालकथा याला मोठा कॉलम देण्यात यावा.

४. दै. लोकमत व दै. सध्यानंदने मनोरंजनात्मक विशेष पुरवणी आठवड्यातून एका दिवशी द्यावे.

५. मनोरंजनात्मक चित्रांना विशेष स्थान देण्यात यावे.

## ५.८ समारोप :

मानवी जीवनामध्ये मनोरंजनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रसारमाध्यमातून मनोरंजन मानवी जीवनास आनंददायी ठरलेले आहे हे वरील चर्चेवरुन स्पष्ट होते. प्रसारमाध्यमांनी ज्याप्रमाणे ज्ञान देण्याचे काम केलेत. त्याचप्रमाणे मनोरंजन करणे हे कामसुद्धा प्रसारमाध्यमाचे आहे हे वरील चर्चेवरुन कळते. त्यासाठी पुरक प्रशिक्षण व प्रबोधनाची गरज आहे. प्रसारमाध्यमांनी नव्या प्रयोगाचे सतत मनोरंजनातून ज्ञान, प्रबोधन व शिक्षणावर भर दिला पाहिजे. त्याचप्रमाणे नवे प्रयोग व नवे प्रमेय कृतीत आणून मनोरंजन पत्रकारिता वाढण्यास मदत झाली पाहिजे.